सकाळ

# लोकसहभागातून बांधले गोटूल

## ग्रामविकासासाठी शुभम झाला ग्रामपरिवर्तक

**नीलेश डाखोरे** : सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २४ : अमरावती येथून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुणे, मुंबई व गुजरात येथे नोकरी केली. दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री ग्रामपरिवर्तक म्हणून निवड झाली. गडचिरोली जिल्ह्यात जायचे असल्याने प्रारंभी थोडी भीती वाटत होती. परंतु, 'कर के देखेंगे' असे ठरवत रुजू झालो. काही दिवसांतच येथे नागरिकांच्या सहभागातून आठवडी बाजार व महिला बचतगटामार्फत मशरूमचा व्यवसाय सुरू केला, लोकसहभागातून गोटूल बांधल्याचे शुभम सांगत होता.

शुभम राऊत (२५, रा. कामठी) मूळचा ग्रामीण भागातील रहिवासी असल्यामुळे गावातील समस्यांची चांगल्याप्रकारे जाणीव आहे. सरकारी योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचत नसल्याने ग्रामीण नागरिक विकासापासून कोसो दूर राहतो. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या विकासासाठी ग्रामपरिवर्तक झालो, असे शुभम अभिमानाने सांगतो.

तो म्हणाला, येथील जंगलांत भ्रमंती केल्यानंतर जंगल असताना गरिबी का, असा प्रश्न पडला. जंगलाचा व नागरिकांचा अभ्यास करायचा असल्यामुळे सीएफआर (सामूहिक वनपट्टा) मिळालेले गाव पाहिजे होते. त्यामुळे काही दिवसांनी ग्रामपंचायत वडसा (खुर्द) स्वतः मागून घेतले. यांतनर मोरावाही गावात ग्रामसभा सक्षम करण्यासाठी मदत केली. गावातील समस्या गावातीलच लोकांनी सोडवाव्या व स्वतःचा विकास करावा यासाठी प्रयत्न करीत आहे.

**» ओढ नवनिर्माणाची - भाग २**



**सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामसभेसाठी नागरिकांच्या सहभागातून तयार केलेले गोटूल.**

### उत्पन्नवाढीवर भर

मोरावाही गावात उत्पन्नवाढीवर भर देत आहे. येथील ग्रामस्थांना फळ झाडांबद्दल मार्गदर्शन केले. ग्रामस्थांना हिरडा, चारोळी, डिंक आदी कशाप्रकारे तोडावे याची माहिती नसल्याने मालाला बाजारात भाव मिळत नव्हता. त्यांना योग्य माहिती दिल्याने मालाला चांगला भाव मिळू लागला आहे, असे शुभम म्हणाला.



**गाव हे विकासाचे मॉडेल बनावे या दृष्टीने प्रयत्न सुरू आहे. गावकऱ्यांचे शहरात होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देत आहे.**

**-शुभम राऊत,** ग्रामपरिवर्तक, गडचिरोली.

सकाळ

# व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा विडा

## रोहित गणोरकरची वेगळी वाट : गडचिरोलीतील दुर्गम भागात जनजागृती

**अतुल मांगे**
@atul_sakal

नागपूर, ता. २५ : सायंकाळ होत आली की त्यांच्या हृदयाची धडधड वाढते...आपली कच्चीबच्ची घेऊन त्या घरात बंदिस्त होतात... भांडणाला आज काय नवीन कारण, या विचाराने त्यांचे अंग घामाघूम होते...रात्र झाली की बहुतांश घरातून भांडणाचे, रडण्याचे आवाज...हे ऐकले की अंगावर अक्षरश: काटा उभा राहायचा...कर्ता पुरुष दारुडा असलेल्या घरातील हा दररोजचा किस्सा...हीच परिस्थिती आपल्याला बदलायची आहे असे मनाशी ठरविले. कारण दारूचे व्यसन हासुद्धा एक आजार आहे, जो बरा होऊ शकतो, असा ठाम विश्वास होता. त्यातूनच व्यसनमुक्त समाजनिर्मितीच्या दिशेने वाटचाल सुरू केली. ज्याला आज उत्तम यश मिळाले असून, संपूर्ण दारूमुक्ती हेच ध्येय असल्याचे रोहित गणोरकर गर्वाने सांगतो.

अमरावती जिल्ह्यातील करजगावचा असलेल्या रोहितला बालपणापासून काहीतरी वेगळे करण्याची इच्छा होती. आपल्या वैयक्तिक आयुष्यासोबतच समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, ही भावना रोहितच्या मनात समज येताच निर्माण झाली. डॉक्टरकीची पदवी मिळवून ५० वर्षांत एकही डॉक्टर न झालेल्या आपल्या गावातील लोकांची सेवा करायची, असे त्याने मनाशी ठरवले. त्या दिशेने वाटचाल करीत त्याने नागपूरच्या मेडिकल कॉलेजमधून डॉक्टरीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो २०१४ मध्ये डॉ. अभय बंग आणि राणी बंग यांच्या 'सर्च'मध्ये दाखल झाला. येथेच आपण खऱ्या अर्थाने घडलो, असे रोहित सांगतो.

> **आपण जे ठरवतो ते नक्कीच करू शकतो. केवळ त्यादिशेने वाटचाल गरजेची आहे. दारूमुक्तीसाठी राजकीय पातळीवर, कायद्याच्या दृष्टीने बदल करणे गरजेचे आहे. दारूबंदीतून दारूमुक्तीकडे वाटचाल असणे गरजेचे आहे.**
> **रोहित गणोरकर**, सदस्य निर्माण संस्था, सर्च फाउंडेशन

चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली या दारूबंदी असलेल्या जिल्ह्यात दारूचा अक्षरश: महापूर वाहतो. महाराष्ट्र शासन, टाटा ट्रस्ट आणि सर्चच्या 'मुक्तिपथ'अंतर्गत गावपातळीवर व्यसनमुक्ती शिबिरांचे आयोजन केले जाते. यातून व्यसनी रुग्णांचे समुपदेश, त्यांच्यावर उपचार आणि त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाते. व्यसनी लोकांचे गट पाडून त्यांच्यावर उपचार करणे सुरू केले.व्यसनाधीन झालेल्यांचे चार गट करून त्यांचे समुपदेशन, उपचार आणि त्यांचे निरीक्षण करून त्यांना व्यसनापासून परावृत्त करण्याचे दिशेने वाटेल ते रोहित आणि त्याचे सहकारी करायचे. सततच्या उपचारातून बऱ्याच लोकांची दारू सुटल्याचे त्याने सांगितले.

**» ओढ नवनिर्माणाची - भाग ३**



रुग्णाला तपासताना रोहित गणोरकर.

### निवासी शिबिरातून मनपरिवर्तन

'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज'अंतर्गत करण्यात आलेल्या जागतिक सर्वेक्षणानुसार दारूचे व्यसन हा मनोशारीरिक सामान्य आजार आहे. जो योग्य उपचाराअंती बरा होऊ शकतो. त्यादिशेने वाटचाल करीत जागतिक मुक्तिपथ संस्थेद्वारे व्यसनी लोकांसाठी बारा दिवसांचे निवासी शिबिर घेतले जाते. ज्यात व्यसनी लोकांच्या समुपदेशनासह उपचार आणि इतरही प्रकारांनी त्यांचे व्यसन सोडविण्याचे प्रयत्न केले जातात.



सकाळ

# समाधानाचे मोल पैशात नाही

## नागपूरचे डॉ. मयूर गडचिरोलीत देतात सेवा

**» ओढ नवनिर्माणाची - भाग १**

**गोविंद हटवार** : सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २३ : नागपुरातला तरुण गडचिरोलीतील ग्रामीण भागात जातो. फिरत्या पथकाच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करतो. त्याची मानसिक रुग्णाशी गाठ पडते. उपचारानंतर मानसिक रोगतज्ज्ञाच्या माध्यमातून रुग्ण बरा होतो. तो बोलताना पाहून मिळणारे समाधान पैशात मोजता येत नाही. हीच खरी रुग्णसेवा असल्याची भावना व्यक्त करतो.

या तरुणाचे नाव डॉ. मयूर भानारकर. ते मूळचे नागपूरचे. शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण झाले. मुंबईतील केईएम रुग्णालयातून एमबीबीएस केले. महाविद्यालयात क्रिकेट टिमचे नेतृत्व केले. मुंबईतील गरिबांच्या शिक्षणासाठी 'वेक्टर' हा उपक्रम सुरू केला. तसेच मेक अ डिफरन्स संस्थेच्या माध्यमातून स्वयंसेवक म्हणून काम केले. तिथून व्यवस्थापन काय असते, ते त्यांना शिकायला मिळाले असे ते म्हणतात. सर्चच्या माँ दंतेश्वरी फिरत्या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाले. धानोरा तालुक्यातील ५८ आदिवासी गावे, सहा आश्रमशाळा यांना ते त्यांच्या सात जणांच्या टिमसह आरोग्यसेवा देतात.



**गडचिरोली : जिल्ह्यातील ग्रामीण भागात रुग्ण महिलेच्या घरी जाऊन तपासणी करताना डॉ. मयूर भानारकर.**

असेच एकदा डॉ. मयूर हे रिंगाटोला येथे फिरत्या पथकासोबत रुग्णांवर उपचार करण्यासाठी गेले. एक मानसिक रुग्ण आला. त्याला बोलताना त्रास व्हायचा. त्यामुळे तो शिव्या देतो, चिडचिड करतो, अशी घरच्यांची तक्रार होती. त्याला तज्ज्ञ मानसोपचाराकडे दाखविण्याचा सल्ला डॉ. मयूर यांनी दिला. त्या रुग्णाला घेऊन ते २५ किमी अंतरावरील डॉ. आरती बंग यांच्याकडे गेले. डॉ. बंग यांनी उपचार करत त्याला बरे केले. रुग्ण व्यवस्थित बोलू लागला. मी आता घरी जातो म्हणू लागला. त्यावेळी त्याच्या आणि त्याच्या नातेवाइकांच्या चेहऱ्यावरील भाव टिपण्याजोगा होता. दोघेही आनंदी होते. ते पाहून झालेले समाधान पैशात मोजता येत नाही, अशी भावना डॉ. मयूर यांनी व्यक्त केली. हीच खरी समाधानाची शिदोरी असल्याचे ते म्हणाले.

> **वैद्यकीय पदवी घेतल्यानंतर मी कुणासाठी काम करणार हे ठरविणे आवश्यक आहे. स्पेशलायझेशन कशात करावं हे आपण कोणत्या लोकांसाठी काम करायचे आहे त्यानुसार ठरवलं पाहिजे.**
> **- डॉ. मयूर भानारकर,**
> वैद्यकीय अधिकारी

सकाळ

# झाले मोकळे आकाश!

## डॉ. हर्षा यांचा महिलांसाठी महिलांद्वारे हेल्थकॅम्प

**» ओढ नवनिर्माणाची - भाग ४**



**हेल्थकॅम्पला आता मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित राहून आरोग्यासंबंधी विविध बाबींवर चर्चा करतात.**

**प्रशांत रॉय** : सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २६ : आदिवासी महिलांसह इतर महिलांनाही 'त्या' भयंकर रोग, आजारांबाबत बोलायला अवघड जाते. लाज किंवा पारंपरिक बंधनांचे ओझे आजही वाहत असल्यामुळे आरोग्याची हेळसांड नेहमीचीच. याविषयी महिलांना बोलते केले, विश्वासात घेतले आणि हेल्थकॅम्पचे आयोजन केले. यामध्ये रुग्ण, डॉक्टर, कर्मचारी सर्वच महिला असल्यामुळे मुक्तपणे त्यांनी अडचणी, समस्या मांडल्या. एवढे दिवस रोग, आजाराच्या अंधारात राहिलेल्या या महिला आता आत्मविश्वासाने पुढे येऊन आपल्या व्यथा सांगतात. तेव्हा एका गाण्याच्या ओळी आठवतात 'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश'. डॉ. हर्षा नन्नावरे आपल्या भावना व्यक्त करीत होत्या.

यवतमाळ जिल्ह्यातील एका लहान खेड्यात डॉ. हर्षा यांचे बालपण गेले. वडील शिक्षक असल्यामुळे अभ्यासाची गोडी लागली. ग्रामीण भागातील दुःख, विविध आजार यासंबंधी आपण काही करायले हवे ही भावना रुजली होती. नवोदय विद्यालयात प्रवेश मिळाला आणि त्यानंतर मागे वळून पाहिलेच नाही. बारावी झाली, नागपूरला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. शिक्षण घेत असताना निर्माण संस्थेकडून ग्रामीण भागात काम कराल का, असे विचारणे झाले. तत्काळ होकार दिला. गडचिरोली जिल्ह्यात यानिमित्ताने काम करता आले. वरिष्ठ डॉक्टर्स, समाजसेवक आणि स्वयंसेवक यांच्यासोबत काम करताना नवनवीन बाबी अभ्यासता आल्या, अनुभवता आल्या.



**स्त्री ही एक अनामिक भीती किंवा दडपणामुळे अबोल राहते. स्वतःच्या शरीराला होणाऱ्या यातना, व्याधी, रोग यांचा उच्चारही त्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे मोकळेपणाने करू शकत नाही. यासंदर्भात त्यांना वैद्यकीय मदत आणि विश्वासाचे बळ देऊन त्यांचे जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करणार आहे.**
**-डॉ. हर्षा नन्नावरे**

निरीक्षणातून जाणवले की ग्रामीण तसेच दुर्गम ठिकाणी वैद्यकीय सोयीअभावी महिलांची अवस्था अतिशय कठीण आहे. डॉक्टर किंवा संबंधित कर्मचारी पुरुष असल्यामुळे महिलांची कुचंबणा होते. शरीराला झालेले रोग, आजार आणि व्याधी याबाबतीत त्या मुक्तपणे व्यक्त होऊ शकत नाही. हे जाणून यादृष्टीने महिलांमध्ये आरोग्याप्रति जागृती करण्याचे ध्येय ठरविले. त्यानुसार कॅम्प, विविध कार्यक्रम आणि प्रत्यक्ष भेटीतून महिलांना प्रोत्साहन देत आहे. वर्षानुवर्षे कवटाळून बसलेल्या आजारांबाबत त्या महिला मोकळेपणाने बोलत होत्या. वैद्यकीय व्यवसायाला आपण या सामाजिक भावनेतून न्याय देऊ शकतो ही भावना यामुळे दृढ झाल्याचे डॉ. हर्षा म्हणाल्या.

rpur

)19

›sal from
›articipate
›lying of
rpur" But
›spective

d bidders
ubmission
›oposals is

r
Ballarpur